नियमीत दिवाणी दावा ५३१/२०१६
नि.क्र. १०२

**शपथेववर पुन्हा सुरु,**

**सरतपास वादी तर्फे श्रीमती एस.एम.बाबरे वकिल यांचे मार्फत**

७. मला दावा मिळकती विषयी माहिती आहे. माझ्या आजोबांचे नाव शंकर बाळू पाटील होते. त्यांना तीन मुले होती त्यांची नावे रामचंद्र, मारुती व गंगाराम अशी होती. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र यांना सहा मुले व दोन मुली असे वारस आहेत. त्यांची नावे वसंत, वामन, रमेश, शरद, सुनिल, राजेश व सगुणाबाई व जनाबाई अशी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती पैकी दावा मिळकत क्र.१ ही शंकर यांच्या मालकीची होती. हे म्हणणे खरे आहे की, आजोबा मयत झाल्यानंतर त्यांचे वारस म्हणजेच त्यांची तीन मुले रामचंद्र, मारुती व गंगाराम यांची नावे त्या जमीनीच्या ७/१२ उता–यावर आली. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत क्र.२ चे मालक हे रामचंद्र शंकर पाटील हे होते. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र यांच्या मिळकती मध्ये म्हणजेच मिळकत क्र.२ मध्ये त्यांच्या वारसांचा प्रत्येकी १/८ इतका हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यात वादीचा १/८ एवढा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत क्र.१ मध्ये आमचा प्रत्येकी १/२४ एवढा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील वाटणी पत्रा नुसार सर्व वारसांना समान हिस्सा देण्यात आलेला नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यातील वाटणी पत्र सन २०१५ मध्ये नोंदणीकृत केले त्यावेळी वादी यांची दोन्ही मुले तुरुंगात होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे वादी यांची मानसिक स्थीती बरोबर नव्हती व ते डिप्रेशन मध्ये गेले होते. (प्रतिवादी यांच्या वकिलांनी या प्रश्नास हरकत घेतली. त्यांनी असे कथन केले की त्याबाबत दाव्यात नमुद केलेले नाही. त्यांची हरकत अंतिम युक्तीवादाचे वेळी विचारात घेतली जाईल.) हे म्हणणे खरे आहे की, सदर वाटणीपत्र नोंदणीकृत करतेवेळी आमच्यात भांडण झाले होते व पोलीसात तक्रारी देखील दाखल करण्यात आल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, वादी वसंत यांना देखील पोलीसांनी अटक केली होती व त्यांची दि.२४/०४/२०१५ रोजी जामीनावर सुटका झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यांची दोन मुले म्हणजेच वादी क्र.१ व २ यांची दि.१३/०८/२०१५ रोजी जामीनावर सुटका झाली होती. हे म्हणणे खरे आहे की,

दाव्यातील वाटणी पत्र नोंदणीसाठी सदर वादी यांच्यावर दबाव टाकण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या वाटणी पत्रानुसार मला देखील समान हिस्सा मिळालेला नाही. त्यावेळेस काय झाले होते हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यातील प्रतिवादी यांनी स्वतःच वाटणीपत्र तयार करुन आणले होते व त्यावर वादींची सही घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, वाटणी पत्र नोंदल्या नंतर त्यातील जमीनीच्या वाटणी नुसार प्रतिवादी यांनी त्यावर कब्जा केला होता. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती पैकी काही जमीनी प्रतिवादी यांना विकसीत करण्यासाठी दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल केल्या नंतर प्रतिवादींनी विकास करारनामे केले आहेत व त्यानुसार दावा मिळकतीवर विकास कामे सुरु केली आहेत.

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ३, ५ ते ७ व ९ तर्फे वकिल श्री.ए.एस. फाटक यांचे मार्फत**

**(या क्षणी प्रतिवादी क्र.४ आणि वादी यांचे वकिल यांनी सदर प्रतिवादी क्र. १ ते ३, ५ ते ७ व ९ यांच्या साठी उलटतपास घेण्यास हरकत घेतली. त्यांनी असे नमुद केले की, प्रतिवादी क्र.४ यांनी यापूर्वी या प्रकरणात त्यांची लेखी कैफियत दाखल केली होती. त्यानंतर ती इतर प्रतिवादी यांनी ती अंगिकृत केली व ती सध्या अभिलेखावर आहे. त्यांची हरकत अंतिम युक्तीवादाच्या वेळी विचारात घेतली जाइल.)**

९. मला आता मी या प्रकरणात नि.क्र.१२ प्रमाणे दाखल केलेली लेखी कैफियत दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्या कैफियत समर्थनार्थ सोबत मी माझे शपथपत्र नि.क्र.१३ प्रमाणे दाखल केले होते. त्यावर देखील माझी सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, ते शपथपत्र दुय्यम निबंधक सहा.अधिक्षक यांचे समोर शपथ घेवून सही केली आहे. त्या शपथपत्रावर सही करण्यापूर्वी मी त्या सहा अधिक्षक यांना माझ्यावर दबाव टाकण्यात आल्याने मी त्यावर सही करत असल्याचे सांगितले नाही. माझ्यावर दबाव टाकल्याने मी लेखी कैफियत व शपथपत्रावर सही केली याबाबत मी सन २०१७ व त्यानंतर लेखी तक्रार केलेली नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, याप्रकरणात वादी यांनी अंतरीम मनाईहुकूमाचा नि.क्र.५ दाखल केला होता व तो दि. २७/०१/२०२२ रोजी नामंजूर करण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर वादी यांनी जिल्हा न्यायालयात किरकोळ दिवाणी अपिल दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या प्रकरणात मी प्रतिवादी यांचे बाजूने लढलो

होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर त्याबाबत उच्च न्यायालय व सर्वोच न्यायालयात देखील मी प्रतिवादींचे बाजूने होतो.

११. मला आता नि.क्र.६५ वरील दाव्यातील वाटणी पत्र दाखवण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, त्या वाटणी पत्रानुसार नवीन सर्वे नं.१५७, जुना सर्वे नं.११६, हिस्सा नं.१२ब एकूण ६.६ गुंठे ही जमीन माझ्या हिश्यास आली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या वाटणी पत्रानुसार सदर जमीनीचा फेरफार माझ्या नावाने मंजुर झाला होता व ७/१२ उता– यावर देखील माझे नाव लागले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या हिश्यात आलेली जमीन मी गणेशकृपा डेव्हलपर्स याना २५ लाख रुपयाच्या मोबदल्यात विकली आहे. (याक्षणी वादींच्या वकिलांनी या प्रश्नास हरकत घेतली. त्यांची हरकत अंतिम युक्तीवादावच्या वेळेस विचारात घेतली जाईल.) त्या वाटणीपत्रा वर माझी सही, फोटो व अंगठा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला ते वाटणीपत्र व मिळालेला हिस्सा मान्य होता व म्हणून मी ती जमीन स्वीकारली व विकली.

१२. मला आता नि.क्र.८९ वरील वाटणी पत्रानुसार मंजुर झालेला फेरफार दाखवण्यात आला. मी तो फेरफार आव्हानीत केलेला नाही. सदर वाटणी पत्र मला मान्य नसल्या बाबत मी तो न्यायालयात आव्हानीत केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणात लेखी कैफियत दाखल करण्यासाठी माझ्यावर कोणी, कुठे, कधी व कसा दबाव आणला ते मी लिहीलेले नाही. मी त्याबाबत इतर प्रतिवादीं विरुध्द पोलीसात किंवा या न्यायालयात तक्रार सन २०१७ ते २०२६ या काळात केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.६५ च्या वाटणीपत्रा नुसार नवीन सर्वे नं.१, जुना सर्वे नं.१, हिस्सा नं.१२क क्षेत्र १६ गुंठे जमीन वामन, सुनिल, शरद, राजेश, रमेश म्हणजेच मी व करसन यांच्या सामाईक हिश्यात आली होती.

प्रश्न.क्र.१ सदर सामुहिक मिळकती पैकी तुम्ही तुमचा अविभाज्य हिस्सा रु.४० लाखात वादी क्र.१ यांना विकला आहे का ?

उत्तर व्यवहार झाला परंतु तसा कायदेशीर हिस्सा झालेला नाही.
(याक्षणी वादींच्या वकिलांनी या प्रश्नास हरकत घेतली. त्यांची हरकत अंतिम युक्तीवादावच्या वेळेस विचारात घेतली जाईल. त्यांनी असे नमुद केले की, त्याबाबत प्रतिवादी यांचे लेखी कैफियतीत कुठेही कथन नाही व तसे कागदपत्र नाही.)

१३.		मी या प्रकरणात नि.क्र.१२ नुसार दाखल केलेली लेखी कैफियत चुकीची आहे हे मला चार ते पाच वर्षांपूर्वी कळाले. हे म्हणणे खरे आहे की, माझा अविभाज्य हिस्सा विकल्या बाबत मला वादींकडून पैसे मिळाले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी या प्रकरणात नि.क्र.५० प्रमाणे माझी लेखी कैफियत दुरुस्त करण्याचा अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यादरम्यानच्या काळात माझ्यावर मला प्रतिवादींकडून कुठलाही त्रास नव्हता. साक्षीदार सांगतो की, दबाव होता. हे म्हणणे खरे नाही की, मला वादींकडून पैसे मिळाल्याने मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत
सही/-

(एन.के. जोशी)
२रे सह दिवाणी न्यायाधीश,
वरिष्ठ स्तर, कल्याण

कल्याण
दिनांक : ११/०८/२०२६